# भारतीय जनता पक्ष

**(केंद्रिय कार्यालय)**

**11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001**

**फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787**

केंद्रिय अर्थसंकल्पा बद्दल लोकसभेतील विरोधी पक्षनेत्या श्रीमती सुषमा स्वराज आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते श्री अरुण जेटली यांच्या प्रतिक्रिया

संसदेत सादर झालेले केंद्रिय अर्थसंकल्पाने भारतीय अर्थव्यवस्थेला खुप काही कमी देऊ केले आहे,असे वाटते. अर्थमंत्र्याने प्रतिकूल परिस्थितीत हा अर्थसंकल्प सादर केला. युपीए सरकारच्या नीतिगत  पक्षाघातामुळे भारतीय अर्थव्यवस्था कठिण परिस्थितीत ढकलली गेली आहे. अर्थमंत्र्यांनी स्वतःला निःसहाय परिस्थितीत ठेवले आहे असेच वाटते. त्यामुळे त्यांची नीति आणि टॅक्सेशन पॉलिसीत फक्त बाह्य देखावा सुंदर वाटतो असा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. अर्थसंकल्पातील शाब्दिक मायाजाल पाहता त्या तुलनेने महत्त्वाकांक्षा

खुप कमी आहे. भारतीय उत्पादनक्षेत्रात काही ठोस पावलांची उणीव भासून आली. कृषिक्षेत्रात पण सरकारने अवगणना केली आहे. सामान्य जनता शब्दांची परंपरागत उल्लेख पण अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही. निर्यातीला प्रोत्साहन देणे तसेच महागाई वर नियंत्रण ठेवण्याकरिता तसेच रुपायाला मजबूत बनवण्यासाठी कोणते खास पाउल उचलण्यात आले नाही. अर्थव्यवस्थेचा विकासदर(जीडीपी) पाच टक्के असल्याची धारणा दर्शविण्यात आल्यानंतर आता नऊ टक्के विकासदरापर्यंत

अर्थव्यवस्था कशाप्रकारे पोचली जाईल या भावी योजनेकरिता अर्थसंकल्पात माहिती देण्यात आलेली नाही.

काही वर्गाला थेट आणि अप्रत्यक्ष कर लावण्यात आलेला आहे. दुसरीकडे खर्च आणि कपात करण्यात आली आहे, ज्यामुळे आर्थिक तूटीचा आकडा चांगला दिसेल. अर्थसंकल्प दस्ताऐवजात अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. चालू वर्षात फूड सबसिडी बिलाचा आकडा रु, 75,000 करोडची तरतूद करण्यात आल्याचा अंदाज बांधण्यात आला होता त्यात सुधार करुन 85,000 करोड खर्च अंदाज करण्यात आला. तर पुढील वर्षातील बजेट मध्ये कपात करुन 80,000 करोड करण्यात आले आहे. अर्थमंत्र्यांनी फूड सिक्योरिटी बिलात अधिक रु. 10,000 करोड अधिक दिल्याचा दावा केला आहे. वास्तविक पाहता अधिक परिणामकारक रु. 5,000 करोड आहेत ती वाढ अत्यंत क्षुल्लक आहे. आरोग्य मिशनमध्ये चालू वर्षात बजेट मध्ये रु.18515 करोडची तरतूद करण्यात आली होती त्यात सुधार करुन रु 15411 करोड करण्यात आली आहे. आगामी वर्षात त्यात फक्त रु.3000 करोडची क्षुल्लक वाढ करण्यात आली आहे. पंचायत राजमध्ये पण अशीच परिस्थिती आहे. युपिए च्या रोजगार हमी योजनेच्या मागे रु. 40,000 करोड वाटण्याचे वचन देण्यात आले होते. मागील दोन वर्षात त्या रक्कमेत कपात होऊन रु.33,000 करोड करण्यात आली आणि चालू वर्षात रु. 29387 करोड खर्चाचा अंदाज बांधण्यात आला आहे, ज्यामुळे येत्या वर्षात त्यात आणखी कपात करण्यात येईल असे वाटते. अर्थमंत्र्यांनी त्याचा सूचीत लक्ष्यांक 33,000 करोड केला आहे. पंतप्रधान रस्ते योजनेत रु.29677 करोडची तरतूद निष्फळतेचे ज्वलंत उदाहरण आहे. चालू वर्षात त्याचा सुधारित अंदाज 40 टक्के म्हणजेच 8,100 करोड आहे. चालू वर्षात त्याचा खर्च वाढून रु.15,690 करोड करणार अशी धारणा आहे.

रोकड रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यात जमा करण्याच्या योजनेला युपीए सरकारने स्वताची विशिष्ट योजना असल्याचा दावा केला आहे. एकूण 26 योजनेमागे रु.5595.02 करोड वाटण्यात आले आहेत. आतापर्यंत त्यामागे मात्र रु. 5.38 करोडचा खर्च करण्यात आला असा अंदाज आहे.

बजेट मध्ये अनेक आव्हाने पण दर्शविण्यात आली आहेत, ज्यामुळे रु. 96980 करोडची पेट्रोलियम सबसिडीत कपात करुन रु. 65,000 करोड करण्यात आली. याचा अर्थ असा आहे की, पेट्रोल-डिझेल आणि गॅसचे भाव यापुढेही वाढण्याची शक्यता आहे.

हा अर्थसंकल्प नीतिविषयक निवेदन नाही. त्यात कोणती खास फेरफार सूचविण्यात आलेले नाही. हे फक्त हिशोब प्रक्रियाच असल्याचे दिसून येते. ज्यामध्ये खर्चात कपात करुन कर वाढविण्यात आला नसल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे अनेक विकास त्वरित होणार नाहीत. खास करुन गरिब, मागासवर्ग आणि खास करुन मध्यम वर्गाला सर्वात जास्त सहन करावे लागेल.

(आर.के.सिन्हा)

मानद मंत्री

भाजप संसदीय पक्ष